(इंग्रजीत टंकलिखित न्यायनिर्णयाचा मराठी अनुवाद.)

**विष्णू साखर कारखाना लिमिटेड, हरखुआ जिल्हा सारण,**

**बिहार चे व्यवस्थापन**

**विरुद्ध**

**त्यांच्या कामगारांच्या वतीने चिनी मिल मजदूर युनियन, हरखुआ,**

**जि. सारन, बिहार**

**(न्या. पी. बी. गजेंद्रगडकर आणि न्या. के. एन. वांचू, जे.जे.)**

औद्योगिक विवाद - राज्य सरकारकडून संदर्भ -क्षमता- नियंत्रित उद्योग- – "समुचित शासन ", याचा अर्थ-उद्योग (विकास आणि नियमन) अधिनियम, १९५१ (१९५१ चा ६५). औद्योगिक विवाद अधिनियम १९४७ (१९४७ चा १४), कलम २ ( क ) (१).

बिहारमधील अपीलकर्त्या साखर कारखान्यातील कामगारांशी संबंधित वाद कामगार संघटनेने उपस्थित केला होता आणि राज्य सरकारकडून संदर्भ देण्यात आला होता. औद्योगिक विवाद अधिनियम, १९४७ च्या कलम २ (क) (१) अन्वये 'समुचित शासन ' म्हणजे केंद्र सरकारने किंवा त्यांच्या प्राधिकारान्वये चालवलेल्या कोणत्याही उद्योगाशी संबंधातील कोणताही औद्योगिक विवाद ....... किंवा अशा नियंत्रित उद्योगाच्या संबंधातील जे केंद्र

शासनाने या बाबतीत विनिर्दिष्ट केलेल्या केले असेल. उद्योग (विकास व नियमन) अधिनियम १९५१ अन्वये साखर हा नियंत्रित उद्योग असल्याने राज्य सरकार संदर्भ करण्यास सक्षम आहे का हा प्रश्न होता.

असा निर्णय देण्यात आला की,औद्योगिक विवाद अधिनियम १९४७ च्या कलम २ (क) (१) अन्वये समुचित सरकार नियंत्रित उद्योगासाठी केंद्र सरकार असू शकेल यासाठी असे नियंत्रित उद्योग केंद्र सरकारने निर्दिष्ट करणे आवश्यक आहे आणि अधिनियमाच्या कलम २ (अ) (१) च्या उद्दिष्टासाठी अधिसूचना नसल्यास राज्य सरकार संदर्भ करण्यास सक्षम होते.

बिजॉय कॉटन मिल्स लि. वि. त्यांचे कामगार आणि अन्य [१९६०] २ एस. सी. आर. ९८२ अनुसरले.

दिवाणी अपील अधिकारिता : दिवाणी अपील १९५८ चा क्रमांक ४०२.

१९५६ च्या संदर्भ क्रमांक ७ मध्ये पाटणा येथील औद्योगिक न्यायाधिकरण, बिहारच्या २९ जानेवारी १९५७ च्या निर्णयातून विशेष परवानगीने अपील.

अपीलकर्त्याच्या वतीने सुकुमार घोष.

एम. के.राममूर्ती, आर. के. गर्ग, ए. एन. नाग आणि सुरेश अग्रवाल यांनी उतरवादींची बाजू मांडली.

एस. पी. वर्मा, हस्तक्षेपक (बिहार राज्य) साठी.

१९६०. मार्च ९. न्या. के. एन. वांचू द्वारे न्यायालयाचा न्यायनिर्णय देण्यात आला

हे अपील पाटणा येथील औद्योगिक न्यायाधिकरणाच्या निवाड्या विरुद्ध विशेष परवानगी दाखल केलेले आहे. अपीलकर्ते बिहार राज्यातील सारण जिल्ह्यातील साखर कारखाना आहे. १९३३ मध्ये रामकृष्ण प्रसाद नावाच्या व्यक्तीची या कारखान्या मध्ये लिपिक म्हणून नेमणूक झाली. हळूहळू ते कामात उन्नती करू लागले आणि ऑक्टोबर १९५२ मध्ये त्यांना दरमहा १४० रुपये मिळत होते. कारखान्याच्या स्टोअर्स विभागातील काम वाढल्याने त्या सुमारास कारखान्याने स्टोअर इन्चार्जचे नवे पद निर्माण केले. ४ ऑक्टोबर १९५२ रोजी बाबूलाल पारेख यांची या नव्या पदावर एकत्रित रुपये १८० प्रति मासिक वेतनावर नियुक्ती करण्यात आली. त्या तारखेला त्यांना नियुक्तीपत्र देण्यात आले . आणि ते एक वर्ष परिवीक्षाधीन राहतील असे सांगण्यात आले. त्यांना आणखी एका पत्राद्वारे तात्काळ पदभार स्वीकारण्यास सांगण्यात आले होते. ७ ऑक्टोबर १९५२ रोजी त्यांनी पदभार स्वीकारला. २८ नोव्हेंबर १९५२ रोजी कारखान्याने स्टोअर्स विभागात कार्यरत असलेल्या विविध लिपिकांना कार्य वाटप करण्याचा आदेश काढला आणि त्यात स्टोअर्स विभागातील सर्व कर्मचारी बाबूलाल पारेख यांच्या हाताखालील म्हणून काम करतील असे नमूद करण्यात आले होते. २ डिसेंबर १९५२ रोजी दूसरा आदेश काढण्यात आला ज्याद्वारे रामकृष्ण प्रसाद यांना दुकानांच्या चाव्या बाबुलाल पारेख यांच्याकडे सुपूर्द करण्याचे आदेश देण्यात आले. त्यानंतर रामकृष्ण प्रसाद यांनी त्यांना स्टोअर्स इन्चार्जच्या

हाताखाली आणण्याच्या विरोधात निवेदन दिले. .हे निवेदन फेटाळण्यात आले. त्यानंतर संघाने एक वाद उपस्थित केला आणि बिहार सरकारने ९ मे १९५६ रोजी एक संदर्भ दिला ज्यात खालील तीन बाबी न्यायधीकरनाकडे पाठविण्यात आल्या-.

१. कामगार श्री. रामकृष्ण प्रसाद, स्टोअर-कीपर, यांची पदस्थिति आणि ते करत असलेल्या कामाच्या स्वरूपात बदल करून आणि स्वतंत्र स्टोअर-इन्चार्ज नेमणूक त्यांच्या हितास बाधा आणली का?

२. वरील उपरिनामीत कामगाराने गेल्या २० वर्षांपासून स्टोअर-इन्चार्जची कर्तव्ये समाधानकारकरित्या पार पाडली आहेत, हे लक्षात घेता त्याच्यावर अधिक वितलब्धीसह स्वतंत्र स्टोअर इन्चार्ज नेमणे अजिबात आवश्यक होते का आणि श्री. रामकृष्ण प्रसाद स्टोअर इन्चार्ज पदावर नियुक्तीस पात्र आहेत का ; आणि

३. वरच्या श्रेणीतील पदोन्नतीच्या उपरिनामीत कामगाराच्या दाव्याकडे व्यवस्थापनाने दुर्लक्ष केले आहे का, आणि जर तसे असेल तर कामगार कुठल्या अनुतोषास हक्कादार आहे ?

हे प्रकरण न्यायाधिकरणासमोर आले तेव्हा कारखान्याच्या वतीने मुख्य युक्तिवाद असा होता की, गुणात्मक आणि संख्यात्मक दृष्ट्या कामगारांची संख्या ठरविण्याचे काम केवळ व्यवस्थापनाचे आहे आणि रामकृष्ण प्रसाद यांचा संबंध होता, स्टोअर इन्चार्जचे नवे पद निर्माण झाल्याने त्यांच्या पदावर कोणताही बाधक रीतेने परिणाम झालेला नाही. दुसरीकडे कामगारांचा

असा युक्तिवाद होता की बाबूलाल पारेख यांची प्रथम रामकृष्ण प्रसाद यांच्या हाताखाली केवळ लिपिक म्हणून नेमणूक करण्यात आली आणि २८ नोव्हेंबर १९५२ रोजी त्यांना रामकृष्ण प्रसाद यांच्या वर स्टोअर इन्चार्ज म्हणून बढती देण्यात आली आणि अशा प्रकारे रामकृष्ण प्रसाद यांना डावलण्यात आले. कामगारांच्या या भूमिकेला कारखान्याने विरोध केला आणि त्याची बाजू अशी . होती की, बाबूलाल पारेख यांची सुरुवातीपासूनच स्टोअर इन्चार्ज म्हणून नेमणूक करण्यात आली होती.

सादर करण्यात आलेल्या पुराव्यांचा विचार केल्यानंतर लवादाने असा निष्कर्ष काढला की, बाबूलाल यांची प्रथम स्टोअर्स विभागात सामान्य लिपिक म्हणून नेमणूक करण्यात आली होती आणि नंतर त्यांना स्टोअर इन्चार्ज करण्यात आले. यामुळे रामकृष्ण प्रसाद यांचा जळफळाट झाला, असे न्यायालयाने म्हटले आहे. उच्च पदावर पदोन्नती हे व्यवस्थापनाचे एकमेव कार्य असून त्यात सामान्यत: ढवळाढवळ करता कामा नये, या तत्त्वाची न्यायाधिकरणाला जाणीव होती. पण असे असूनही हे हस्तक्षेपासाठी योग्य प्रकरण आहे, असे त्यांचे मत होते. परंतु लवादाने दिलेल्या आदेशात नमूद न केलेल्या इतर बाबींवर न्यायालयाने कारखान्याने केलेल्या व्यवस्थेत हस्तक्षेप करणार नाही, असे मत व्यक्त केले. त्याऐवजी रामकृष्ण प्रसाद यांना न्यायाची उद्दिष्टे पूर्ण करण्यासाठी त्याच्या आदेशाच्या तारखेपासून दरमहा रुपये ३० वेतनवाढ दिली. या आदेशाला आमच्यासमोर आव्हान दिले जात आहे.

अपीलकर्त्याच्या वतीने आमच्यासमोर दोन मुद्दे मांडण्यात आले आहेत .. सर्वप्रथम साखर हा नियंत्रित उद्योग असल्याने हा संदर्भ अकार्यक्षम असून हा संदर्भ केवळ केंद्र सरकारला देता आला असता, राज्य सरकारला नाही असे म्हंटले आहे. दुसरं म्हणजे रामकृष्ण प्रसाद यांना दरमहा ३० रुपये वेतनवाढ देण्याचा लवादाचा आदेश उघडपणे विकृत असून नवीन पदाची निर्मिती आणि त्यावर बाबूलाल पारेख यांची नेमणूक करून रामकृष्ण प्रसाद यांच्या स्थितीत किंवा भत्त्यात कोणताही बदल झाला नाही असे म्हंटले आहे.

जो पर्यन्त संदर्भाच्या क्षमतेचा प्रश्न आहे तितपत आमचे असे मत आहे की त्यात काही बळ नाही. असाच प्रश्न बिजॉय कॉटन मिल्स लिमिटेड विरुद्ध त्यांचे कामगार आणि अन्य एक[1] या प्रकरणात या न्यायालयासमोर उपस्थित करण्यात आला होता. त्यांचे कामगार व अन्य (१) व तेथे औद्योगिक विवाद अधिनियम १९४७ च्या कलम २ (क) (१ ) च्या भाषेवर असे म्हटले होते की, त्यापूर्वी नियंत्रित उद्योगाला तरतूद लागू होऊ शकते. औद्योगिक विवाद अधिनियमाच्या कलम २ (क) (आय) च्या उद्देशाने केंद्र सरकारने अधिसूचना काढणे आवश्यक आहे. कलम २ (क) (१ ) च्या भाषेत :-

"समुचित शासन' याचा अर्थ केंद्र शासनाने किंवा त्यांच्या प्राधिकारान्वये किंवा एखाद्या रेल्वे कंपनीने चालवलेल्या कोणत्याही उद्योगाच्या संबंधातील किंवा केंद्र शासन याबाबतीत

1 (१९६०) एस. सी. आर.९८२

विहित करील अशा नियंत्रित उद्योगाच्या संबंधातील  कोणत्याही औद्योगिक विवादाच्या बाबतीत किंवा  बँकिंग किंवा विमा कंपनी , खाण  तेलक्षेत्र किंवा  प्रमुख बंदर संबंधित औद्योगिक वादाच्या संदर्भात, केंद्र शासन.”

युक्तिवाद असा आहे की, उद्योग (विकास व नियमन) अधिनियम, १९५१ चा क्रमांक ६५ अन्वये साखर हा नियंत्रित उद्योग असल्याने, साखर उद्योगाच्या संदर्भात कलम २ (क) (१) च्या उद्देशाने सरकार म्हणजे केंद्र सरकार. कलम २ (क) (१) मध्ये "केंद्र सरकारने या संदर्भात निर्दिष्ट केलेल्या कोणत्याही नियंत्रित उद्योगासंबंधी" या शब्दांवर भिस्त  ठेवण्यात आली आहे. उद्योग (विकास व नियमन) अधिनियम १९५१ अन्वये साखर हा नियंत्रित उद्योग आहे हे खरे आहे, परंतु आमच्या मते हे प्रकरण संपत नाही. नियंत्रित उद्योगासाठी कलम २ (क) (१) अन्वये समुचित शासन केंद्र सरकार असावे यासाठी असे नियंत्रित उद्योग केंद्र सरकारने कलम २ (अ) (१) च्या उद्देशाने निर्दिष्ट करणे आवश्यक आहे. आमच्या मते .हे कलम २ (क) (१) मध्ये "केंद्र सरकारने या संदर्भात निर्दिष्ट केल्याप्रमाणे नियंत्रित उद्योग" या शब्दांवरून स्पष्ट होते. कलम २ (क) (१) च्या या तरतुदीला आकर्षित करण्यासाठी उद्योग हा नियंत्रित उद्योग असणे पुरेसे नाही तसेच कलम २ (क) (१) च्या अर्थाने केंद्र सरकार समुचित शासन  बनण्यापूर्वी केंद्र सरकारचे नियंत्रित उद्योग म्हणून कलम २ (क) (१) च्या हेतूने हे निर्दिष्ट करणे आवश्यक आहे. या संदर्भात आपण फायरब्रिक्स अँड पॉटरीज लिमिटेड इ. विरुद्ध फायरब्रिक्स अँड पॉटरीज लिमिटेड वर्कर्स युनियन

लिमिटेड [२] या प्रकरणाचा संदर्भ घेऊ शकतो जिथे हाच दृष्टिकोण घेतला गेला आहे. बिजॉय कॉटन मिल्स[३] लिमिटेड या प्रकरणात आधीच सांगितल्याप्रमाणे कलम २ (क) (१) मध्ये दिसणाऱ्या या शब्दांचा तोच योग्य अर्थ आहे असे आमचे मत आहे त्यामुळे संदर्भ सक्षम नव्हता हा आक्षेप फोल ठरतो.

आम्ही पुढे कारखान्याच्या वतीने मांडलेल्या युक्तिवादाकडे वळतो की, नवीन पदाची निर्मिती आणि त्यावर बाबूलाल पारेख यांची नेमणूक यामुळे वस्तुतः रामकृष्ण प्रसाद यांच्या दर्जा आणि वितलब्धीचा जितका संबंध आहे तितपत कोणताही पूर्वग्रह नव्हता आणि. रामकृष्ण प्रसाद यांना प्रति महिना रुपये ३० वेतनवाढ देणे लवादाला कोणत्याही परिस्थितीत योग्य नाही. लवादाने हा आदेश देताना ज्या मुख्य विचाराचा प्रभाव पडला तो म्हणजे लवादाच्या दृष्टीने रामकृष्ण प्रसाद यांच्या जागी बाबूलाल पारेख यांची नियुक्ती करण्यात आली, ज्यांना प्रथम त्यांच्या हाताखाली लिपिक म्हणून नियुक्त करण्यात आले. न्यायधिकरणाचा हा दृष्टिकोण आमच्या मते स्पष्टपणे चुकीचा आहे. ४ ऑक्टोबर १९५२ च्या नियुक्ती आदेश बाबूलाल पारेख यांची सुरुवातीपासूनच रुपये १८० प्रतिमहिना या वेतनावर स्टोअर इन्चार्ज म्हणून नेमणूक करण्यात आल्याचे स्पष्टपणे दर्शविते. बाबूलाल ने सुरुवातीला लिपिक म्हणून काम केले असे मत व्यक्त करताना न्यायधिकरणाने काही नोंदींचा संदर्भ दिला. ऑक्टोबर

२. एल. एल. आर. (१९५५) मिस. ५४६

३. [१९६०] २ एस. सी. आर. ९८२

नोव्हेंबर आणि डिसेंबर महिन्याच्या हजेरी रजिस्टरवरून बाबूलाल पारेख ७ ऑक्टोबर ते ९ नोव्हेंबर या कालावधीत उपस्थित असल्याचे दिसून येते. त्यानंतर ११ नोव्हेंबर ते डिसेंबर अखेरपर्यंत त्यांनी हजेरी रजिस्टरवर स्वाक्षरी केली. कारखान्याचे कामगार कल्याण अधिकारी चौधरी यांचे निवेदन असे होते की, कारखान्यात अशी प्रथा होती की, हजेरी रजिस्टरमध्ये अधिकाऱ्यांची हजेरी उपस्थित म्हणून अंकित करण्यात येत असे तर लिपिक स्वत: त्यावर स्वाक्षरी करायचे. बाबूलाल पारेख यांनी या रजिस्टरवर नोव्हेंबर मध्ये स्वाक्षरी केल्याने लवादाने असा निष्कर्ष काढला आहे की, सुरुवातीला तो लिपिक असावा. .मात्र, ७ ऑक्टोबर ते ९ नोव्हेंबर या कालावधीत बाबूलाल पारेखला उपस्थित असल्याचे अंकित करण्यात आले यावरून ते कारकून नसल्याचे स्पष्ट होईल. न्यायाधिकरणाने याकडेही पूर्णपणे दुर्लक्ष केले की २८ नोव्हेंबर ते डिसेंबर अखेरपर्यंत बाबूलाल पारेख हे लिपिक नसून स्टोअर इन्चार्ज असतानाही जरी त्यांना उपस्थित म्हणून अंकित करायला हवे होते, त्यांनी रजिस्टरवर स्वाक्षरी केली. हे कसे घडले हे चौधरी यांना सांगता आले नाही, पण हे समजावून सांगणारे ते क्वचितच होते. मात्र, बाबूलाल पारेख हे रजिस्टरमध्ये उपस्थित असल्याचे चिन्हांकित केले होते की त्यावर स्वाक्षरी केली होती याला महत्त्व देता येणार नाही, हे या गोंधळातून स्पष्ट होते. बाबूलाल पारेख यांचा दर्जा ठरविणारी खरी गोष्ट म्हणजे ४ ऑक्टोबर १९५२ चा नियुक्तीचा आदेश जो लवादाने योग्य मानला

आहे. उलटतपासणी अंती चौधरी यांना एक प्रश्न विचारण्यात आला की, त्यांनी आदल्या रात्रीच दिलेली विधाने त्यांनी तयार केली होती पण त्यांनी ती फेटाळून लावली. आम्ही उतरवादींच्या वतीने ही सूचना स्वीकारू शकत नाही की नियुक्ती आदेश मागील तारीख टाकलेला होता, कारण चौधरी यांना तशी कोणतीही सूचना केली गेली नव्हती आणि न्यायाधिकरणालाच तसे आढळले नाही. त्यामुळे हे स्पष्ट झाले आहे की , सुरवातीला रामकृष्ण प्रसाद यांच्या हाताखाली बाबूलाल पारेख यांची नेमणूक करण्यात आल्याचा लवादाचा निष्कर्ष हा अत्यंत विपर्यस्त असून बाबूलाल पारेख हे सुरुवातीपासूनच स्टोअर इन्चार्ज म्हणून कार्यरत होते असे म्हणावे लागेल. आता रामकृष्ण प्रसाद यांचा जेवढा संबंच येतो  तिथपर्यंत बाबूलाल पारेख यांच्या नियुक्तीनंतर त्यांचे काम आणि मानधन तेवढेच राहिले. काम वाढल्यामुळे स्टोअर्स विभागात उच्च पद निर्माण झाले असेल तर रामकृष्ण प्रसाद हे पूर्वी स्टोअर-कीपर म्हणून काम करत होते म्हणून त्यांना पदोन्नतीचा दावा करता येत नव्हता. .अर्थात या प्रकरणात अधिक्रमनाचा प्रश्नच उद्भवत नाही आणि म्हणूनच जळफळाट  होण्याचे कोणतेही वाजवी कारण नाही. मा. न्यायधिकरणाने स्वतः हे दाखवून दिले की "उच्च पदावर पदोन्नती हे व्यवस्थापनाचे एकमेव काम होते" आणि या प्रकरणाप्रमाणे नवीन पद निर्माण करून नवीन व्यक्तीची नेमणूक केल्यास, रामकृष्ण प्रसाद यांच्या दर्जावर कोणत्याही प्रकारे प्रतिकूल परिणाम झाला असे म्हणता येणार नाही. रामकृष्ण प्रसाद यांच्या बाजूने सर्व काही सांगितल्यानंतरही न्यायाधिकरणाने व्यवस्थेत हस्तक्षेप केला नाही, ज्याची करणे त्यांनी

आदेशात नमूद केली नाहीत, हेही उल्लेखनीय आहे. त्यामुळे रामकृष्ण प्रसाद यांना प्रति मासिक रुपये ३० वेतनवाढ देण्याचे कारण नव्हते कारण बाबूलाल पारेख यांच्या नियुक्तीमुळे त्यांच्या वेतनवाढीच्या स्वरूपात कोणतीही भरपाई मिळण्याचा दावा कामगारांनीही केला नव्हता. त्यामुळे न्यायाधिकरणाचा हा आदेश स्पष्टपणे निराधार असून तो रद्द करण्यात यावा. त्यामुळे आम्ही अपील मान्य करतो आणि लवादाचा आदेश रद्द बातल ठरवतो आणि रामकृष्ण प्रसाद यांना कोणताही दिलासा देत नाही असा निर्णय देतो. अशा परिस्थितीत आम्ही खर्चाबाबत कोणतेही आदेश देत नाही.

अपील मंजूर.

*******

**अस्वीकरण**

या न्यायनिर्णयाच्या मराठी भाषेतील या अनुवादाचा वापर हा पक्षकारास त्याच्या/ तिच्या मातृभाषेमध्ये त्याचा अर्थ समजून घेण्यापुरताच मर्यादित राहील आणि त्याचा इतर कोणत्याही कारणाकरता वापर करता येणार नाही तसेच इंग्रजी भाषेतील न्यायनिर्णय हाच सर्व व्यावहारिक आणि कार्यालयीन वापराकरिता विश्वसनीय असेल आणि तोच त्यातील आदेशाच्या निष्पादन आणि अंमलबजावणी करता वैध मानला जाईल.

*******